ePaper

शिंदे गटात नाराजीनाट्य, 300 पदाधिकारी 'वर्षा'वर, राजीनाम्याचा इशारा

| वर्ष - 7 | अंक - 108 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 20 ऑगस्ट 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



## आतील पानांत


- अरे मॅच आहे की कॉमेडी शो?
- जरीन कामावर परतली
- लष्कराचा ट्रक दरीत कोसळला!
- सांगलीत जनावरांचे आठवडी बाजार


# लेखणीतून सत्ताधाऱ्यांना घाम फोडा : राज ठाकरे!

## » पिंपरी-चिंचवड शहरात पत्रकार पुरस्कार सोहळा

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सध्याच्या प्रस्थापित नेत्यांच्या दलबदलू राजकीय भुमिकेवर सडेतोड लेखन करून चुका दाखविणे गरजेचे आहे. पुर्वी आपल्या लेखणीतून संपादकांनी राजकीय नेतृत्वांना त्यांच्या चुका दाखविल्या आहेत. तशाच पद्धतीने आजही निर्भिडपणे लिखाण करून चुकीची भूमिका घेणाऱ्या सत्ताधाऱ्यांना घोम फोडला पाहिजे, असे प्रतिपादन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमूख राज ठाकरे यांनी केले. तसेच राजकीय नेत्यांवर शाब्दिक हल्ले करताना शहानिशहा करणे देखील गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.**



**खूनाचा आरोप झाला तेव्हा चुकीचे लिहिले**

**» 1986 रोजी माझ्यावर खुनाचा आरोप झाला. आम्ही घरात बसलो होतो. तेव्हा राज ठाकरे फरार अशी बातमी एका सांज दैनिकाची हेडलाइन होती. अशा वेळी माझ्यासारखा एकजण उठला आणि कानाखाली दिली तर? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.**

पिंपरी-चिंचवड एडिटर गिल्डच्या वतीने उत्कृष्ट कामगिरी करताना अडचणींना सामोरे जाणाऱ्या पत्रकारांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. आकुर्डी येथील ग.दी. माडगूळकर सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. या वेळी पत्रकार हल्ला विरोधी कायदा परिषद या विषयावर प्रमूख वक्ते म्हणून राज ठाकरे बोलत होते.

या वेळी लोकमत पुणेचे संपादक संजय आवटे, सकाळचे सम्राट फडणीस, पुढारीचे सुनिल माळी, टाईम्स नाऊचे मंदार फणसे, लोकशाहीचे कमलेश सुतार आदीसह विविध क्षेत्रातील पत्रकार या वेळी उपस्थित होते. पीसीबीचे अविनाश चिलेकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

या वेळी लोकशाहीचे संपादक कमलेश सुतार, पुण्यनगरीचे अनिल मस्के, डिजीटल मीडियाचे अमित मोडक, संदीप महाजन, लोकमत यवतमाळचे अविनाश खंदारे, न्युज स्टेटच्या असोसिएट एडिटर अश्विनी सातव डोके, पोलिसनामाचे नितीन पाटील, पुढारीचे आशिष देशमुख, न्यूज 18 लोकमतचे गडचिरोली प्रतिनिधी महेश तिवारी, झी 24 तास साताराचे तुषार तपासे, टीव्ही 9 चे सागर सुरवसे, तर न्यूज 18 लोकमतचे **(उर्वरित पान 3 वर)**

# ऑफद्वारे मतदार नोंदणी करा!

## » पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने नवीन मतदारांना आवाहन

। पिंपरी । महाईन्यूज ।



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने नवीन मतदार नोंदणीचे काम वेगाने सुरू केले आहे. पिंपरी, चिंचवड आणि भोसरी या तीनही विधानसभा मतदार संघात शनिवारी (दि.19) आणि रविवारी (दि. 20) पत्रक वाटून जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच या पत्रकावर ॲप डाऊनलोड करण्यासाठी स्कॅनर देण्यात आले आहेत. नवमतदारांनी कोड स्कॅन करून माहिती भरून आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करावे, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी नीलेश देशमुख यांनी केले आहे. तसेच चिंचवड विधानसभा मतदार संघात मतदार यादी शुध्दीकरणाचे काम युद्धपातळीवर सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. चिंचवड मतदार संघात घरोघरी बीएलओ भेट देत असून मतदार यादी शुध्दीकरण करण्यात येत आहे. नवमतदारांना नाव नोंदणी करण्यासाठी मतदारांसाठी- अर्ज क्र. 6, परदेशी मतदारांची नोंदणीसाठी- अर्ज क्रं.6 अ, निवडणूक प्रमाणीकर फॉर्म-6 ब, इतर व्यक्तीचे नाव समाविष्ट करण्याबाबत आक्षेप घेण्यासाठी, स्वतःचे नाव वगळण्यासाठी, इतर कोणत्याही व्यक्तीचे नाव मृत्यू किंवा स्थलांतर झाल्यामुळे वगळण्यासाठी - अर्ज क्र. 7, मतदार यादीतील तपशिलामध्ये करावयाच्या दुरुस्तीसाठी - अर्ज क्र. 8 भरून द्यावा, असे आवाहनही मतदार नोंदणी अधिकारी देशमुख यांनी केले.नवमतदारांना मतदार यादीत नाव नोंदणी करण्यासाठी त्यांच्या जनजागृती होण्यासाठी तिनही मतदार संघात पत्रके वाटण्यात येणार आहेत. तसेच या पत्रकावर ॲप डाऊनलोड करण्यासाठी स्कॅनर देण्यात आले आहेत. नवमतदारांना कार्यालयात जाण्याची गरज नाही. कोड स्कॅन करून माहिती भरून आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करावे, असे आवाहन देशमुख यांनी केले.

# संतपीठ हे जीवन घडविणारे ज्ञानपीठ ; हभप बाजीराव चंदिले

## » संतपीठात गुरुपूजन सोहळा उत्साहात

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**संतपीठ हे विद्यार्थ्यांना संस्कार देणारे, त्यांचे जीवन घडवणारे ज्ञानपीठ आहे. संस्कृत, हिंदी, मराठी व इंग्रजी या चार भाषांवर प्रभुत्व मिळवून संतांची महती साता-समुद्रापार संतपीठाच्या विद्यार्थ्यांनी पोहोचवावी, ही हभप राजू महाराज ढोरे यांची इच्छा आहे, असे मत हभप बाजीराव चंदिले यांनी व्यक्त केले.**

जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठाच्या मुक्त संगीत शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित गुरुपूजन सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हभप पुरुषोत्तम महाराज मोरे (अध्यक्ष- देहु संस्थान), हभप बाजीराव चंदिले (सरचिटणीस तथा अध्यापक वा.शि.सं. आळंदी), हभप प्रमोद महाराज जगताप (वाणीभूषण बारामती, अभ्यासक संतपीठ), हभप स्वामी हनुमान चैतन्य (अध्यापक वा.शि. संस्था, आळंदी), विजय थोरात (सहायक आयुक्त शिक्षण विभाग), डॉ. भावार्थ देखणे (सदस्य सांस्कृतिक समिती संतपीठ), माजी नगरसेवक कुंदन गायकवाड, माजी स्विकृत सदस्य संतोष मोरे व दिनेश यादव, मुक्त संगीत शिक्षण विभाग प्रमुख तसेच संतपीठ संचालक हभप राजू महाराज ढोरे, डॉ. स्वाती मुळे आदी उपस्थित होते

हभप प्रमोद महाराज जगताप



म्हणाले, ज्ञान पाहिजे असेल तर गुरु जवळ जावे लागते. गुरु देती ज्ञान दर्शनी समाधान.. असे त्यांनी गायकवृंदाना आत्मियतेने सांगितले आहे. गायनाचा प्रवास आरोह- अवरोह होतो.

**(उर्वरित पान 3 वर)**

# पालिकेच्या 6 रुग्णालयांचा कायापालट!

## 500 खाटांची भर पडणार : 15 कोटींचा खर्च

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे महापालिकेच्या प्रमुख रुग्णालयांचा कायापालट करून तेथील उपचारांच्या खाटांची संख्या वाढविण्यासाठी महापालिका प्रशासनाने कंबर कसली आहे. त्यासाठी येत्या काही दिवसांत पंधरा कोटी रुपयांहून अधिक खर्च या रुग्णालयांवर केला जाणार आहे. पहिल्या टप्प्यात सहा रुग्णालयांमध्ये सुधारणा करण्यात येणार असून, त्यातून अंदाजे पाचशे खाटांची भर पडणार आहे.**

पुणे शहराची लोकसंख्या ५० लाखांच्या घरात असताना महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये जेमतेम पाचशे ते सहाशे खाटा उपचारांसाठी उपलब्ध आहेत. त्या तुलनेत पिंपरी-चिंचवड महापालिकेची लोकसंख्या २५ लाख इतकी असताना तेथे १,३०० खाटा उपचारांसाठी आहेत. महापालिकेच्या बहुतांश रुग्णालयांमध्ये उपलब्ध असलेल्या खाटा आणि उपचार करण्यासाठी कार्यान्वित असलेल्या खाटांमध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आहे. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे यांनी या सर्व रुग्णालयांचे सर्वेक्षण करून घेतले असून, जुजबी डागडुजी केल्यानंतर कार्यान्वित खाटांची संख्या वाढणार आहे. कमला नेहरू रुग्णालय, कै. मुरलीधर पांडुरंग लायगुडे रुग्णालय, कै. चंदुमामा सोनवणे रुग्णालय, डॉ. दळवी रुग्णालय, कै. राजीव गांधी रुग्णालय, येरवडा, संजय गांधी रुग्णालय, बोपोडी या सहा रुग्णालयांमध्ये तातडीने दुरुस्ती करण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिकेच्या भवन आणि आरोग्य विभागाकडून एकत्रित आराखडा तयार करण्यात आला आहे. या रुग्णालयांमध्ये दुरुस्ती झाल्यानंतर ४४० खाटांची भर पडणार आहे. पहिल्या टप्प्यात जरी सहा रुग्णालये घेण्यात येणार असली तरी टप्प्याटप्प्याने सर्वच रुग्णालयांची डागडुजी करण्यात येणार आहे. या आर्थिक वर्षात महापालिकेच्या आरोग्य व्यवस्थेवर अधिक लक्ष देण्यात येणार असल्याचा दावा महापालिका प्रशासनाकडून करण्यात आला आहे.



### ‘सीएसआर’चे सात कोटी रुपये

» महापालिका प्रशासनाने करोनाकाळात नागरिकांना केलेल्या आवाहनानंतर मोठ्या प्रमाणात ‘सीएसआर’ निधी मिळाला होता. त्यातील सात कोटी रुपये शिल्लक आहेत. महापालिका आयुक्त विक्रमकुमार यांनी हे सात कोटी रुपये आरोग्य विभाग आणि भवन विभागाला देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार भवन विभागाकडून रुग्णालयांची डागडुजी करण्यात येत आहे. आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत, तर आरोग्य विभागाकडून या ठिकाणी आवश्यक मनुष्यबळ, औषधांचा साठा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यानंतर येथे उपचार करणे शक्य असलेल्या खाटांची संख्या वाढणार आहे, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे यांनी दिली.

> “ महापालिका रुग्णालयांमध्ये उपचारांसाठी आवश्यक असणारी सामग्री खरेदी करणे, रुग्णालयांची डागडुजी करण्यात येणार आहे; तसेच या ठिकाणी मनुष्यबळ भरण्यासाठी येत्या महिनाअखेरीस प्रत्यक्ष मुलाखती ठेवण्यात आल्या आहेत.
>
> **- विक्रमकुमार,** महापालिका आयुक्त तथा प्रशासक

- » कमला नेहरू रुग्णालय ४०० २७० पाच कोटी
- » कै. मुरलीधर लायगुडे रुग्णालय १०० १० दीड कोटी
- » डॉ. दळवी रुग्णालय १२० १५ एक कोटी
- » कै. राजीव गांधी रुग्णालय १०० ५५ ५० लाख
- » कै. चंदुमामा सोनवणे रुग्णालय १०० ७६ अडीच कोटी
- » संजय गांधी रुग्णालय, बोपोडी ७५ ०० ५० लाख
- » कै. अण्णासाहेब मगर प्रसूतिगृह, हडपसर ०० ०० ५० लाख
- » छत्रपती प्रसुती गृह, हडपसर ०० ०० २५ लाख
- » डॉ. होमी भाभा रुग्णालय ०० ०० एक कोटी ६० लाख

---

# सगळीकडेच तोडफोड करत सुटू नका

## » कार्यकर्त्यांना राज ठाकरेंचा सबुरीचा सल्ला

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मनसे अध्यक्ष राज ठाकरे पुन्हा आक्रमक झाले आहे का ? असा प्रश्न आता या दोन ते तीन दिवसात झालेल्या आंदोलनातून उपस्थित होत आहे. राज ठाकरे यांनी रस्त्यांवर पडलेल्या खड्डयांवरून आंदोलन करण्याचे आदेश दिल्यानंतर मनसैनिक प्रचंड आक्रमक झाले आहेत. खळ्ळ खट्याक या मनसेस्टाईलन पुन्हा एकदा मनसैनिक आंदोलन करताना दिसत आहेत. उदाहरण सांगायचं झालं तर कालच मनसैनिकांनी राजापूर टोलनाका फोडला होता.**



मात्र, राज ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना सांगितलं की सगळीकडे तोड फोड करण्याची गरज नसते, मी फक्त एवढचं सांगितलं की लोकांना त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी. पण महाराष्ट्र सैनिक रस्त्यावर उतरणार हे स्वाभाविक आहे.आज राज ठाकरे हे पुण्यातल्या हडपसर येथे विधानसभा महिलाअध्यक्षा इंद्रायणी अजय न्हावले यांच्या जनसंपर्क कार्यलयाच्या उद्घाटन कार्यक्रमला उपस्थित होते. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी विविध विषयांवर आपले मत मांडले आहे. राज ठाकरे म्हणाले की, हे खड्डे पहिल्यांदा पडले नाही. गेले अनेक वर्षे हे खड्डे रस्त्यांवर पडतात. लोक त्याच्यावरूनच जातात. मला आपल्या जनतेच आश्चर्य वाटत "जे लोक तुम्ही निवडून देतात ते तुमच्या समोर रस्त्यावरचे खड्डे आणि इतर सगळे प्रश्न उभे करतात. परत तुम्ही त्याच लोकांना निडवून देतात जाती आणि धर्मांचा नावावरती' म्हणून हे प्रश्न कधी सुटणार नाही. जो पर्यंत लोकांमधला राग हा मतपेटीत उतरत नाही तो पर्यंत हे खड्डे बुजणार नाहीत. आजपर्यंत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे अनेक आंदोलन केली. पदरी काय पडलं ? आणि महाराष्ट्राच नुकसान करतात त्यांना तुम्ही निवडून देता तरी आमचे आंदोलन सुरू आहे. या सगळ्या मधून सरकारचे डोळे उघडतील अशी अपेक्षा आहे. असे मत राज ठाकरे यांनी व्यक्त केलं आहे.

### कायदा नावाची काहीच गोष्ट नाही

» आज राज्यातील अनेक महापालिकांमध्ये प्रशासक राज्य आहे. याबाबत राज ठाकरे यांना विचारलं असता ते म्हणाले की, आपल्याकडे कायदा नावाची काहीच गोष्ट राहिली नाही. निवडणुका कधी होणार तर आम्हाला वाटेल तेव्हा होणार, असं सध्या राज्यात चित्र आहे. इतके वर्ष काय बाकीचे कारणे नव्हते का असा प्रश्न यावेळी राज ठाकरे यांनी केला. दरम्यान, राज यांनी पुणे ते हडपसर आज प्रवास केला. या प्रवासाबाबत राज ठाकरे म्हणाले की कोणताही प्लॅन नसल्याने कशी शहरे वाढत आहे हे आपण पहातच आहे. आज पुणे कुठून कुठे पसरत आहे हे कोणालाच माहीत नाही. सध्या काय झालं आहे मतदार वाढवा मतदान करून घ्या बाकीचं गेलं खड्डयात अस चित्र आहे. टाऊन प्लॅनिंग बाबत काहीच नाहीये अस यावेळी राज ठाकरे म्हणाले.

---

# गणेश वर्गणीसाठी जबरदस्ती करू नका

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

गणरायाच्या आगमनाला अवघा एक महिना उरला आहे. त्यामुळे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे कार्यकर्ते कामाला लागले आहेत. कंपन्या, दुकाने आणि घरोघरी जाऊन वर्गणी गोळा करण्यावर सध्या भर देण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर ‘वर्गणी गोळा करताना कोणावरही जबरदस्ती करू नका,’ असा सल्ला पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी मंडळांना दिला आहे. दरम्यान, नागरिकांच्या तक्रारी आल्यास गुन्हे दाखल करू, असा इशाराही त्यांनी दिला आहे. करोनाकाळात अनेकांच्या नोकऱ्या गेल्या. दुकानदारांचे व्यवसाय डबघाईला आले होते. त्यामुळे शहरातील काही मंडळांनी वर्गणी गोळा केली नव्हती. मात्र, आता व्यवसाय पूर्वपदावर येऊन दोन वर्षे झाली आहेत. दोन वर्षे वर्गणीत वाढ न केल्याने यंदा काही मंडळांच्या कार्यकर्त्यांनी वर्गणी वाढवून देण्याचा व्यापारी आणि दुकानदारांकडे आग्रह धरला आहे. दुसरीकडे मात्र, गेल्या वर्षी इतकीच किंवा त्यापेक्षा कमी वर्गणी आकारावी, अशी भूमिका व्यापारी वर्गाने घेतली आहे.

> “ गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांनी व्यापारी देतील तेवढीच वर्गणी घ्यावी. वर्गणीसाठी कोणावरही जबरदस्ती करू नये, वर्गणीबाबत जबरदस्ती केल्यास आणि याबाबत तक्रार आल्यास संबंधित मंडळांवर गुन्हा दाखल केला जाईल.
>
> **- विनयकुमार चौबे,** पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड

# महापालिकेत प्रशासकीय खांदेपालट ?

## » आयुक्त शेखर सिंह हतबल : विविध विकासकामे खोळंबली

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेचे तत्कालीन अतिरिक्त आयुक्त (दोन) जितेंद्र वाघ यांची बदली झाल्यापासून या विभागांतर्गत येणाऱ्या विकासकामांची गती मंदावली आहे. त्यांच्या जागी आलेले विजय खोराटे यांना विभागाचा अभ्यास करण्यास उशीर लागत आहे. त्यामुळे विकासकामे मार्गी लागत नसल्याची तक्रार लोकप्रतिनिधींकडून होत आहे. परिणामी, आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त यांच्यावर कामाचा ताण वाढून नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. परिणामी, महापालिकेत अधिकाऱ्यांच्या जबाबदारीचे खांदेपालट होण्याची शक्यता आहे, अशी चर्चा महापालिका वर्तुळात आहे.**



पिंपरी ।पिंपरी-चिंचवड महापालिकेला सध्या तीन अतिरिक्त आयुक्त आहेत. अतिरिक्त आयुक्त (एक)प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त (दोन) विजय खोराटे तर अतिरिक्त आयुक्त (तीन) उल्हास जगताप हे आहेत. अतिरिक्त आयुक्त (दोन) कडे सामान्य प्रशासन, माहिती व तंत्रज्ञान, पशु वैद्यकीय (बहिणाबाई चौधरी प्राणिसंग्रहालय), क्रीडा विभाग (सार्वजनिक वाचनालय, प्रेक्षागृहांसहित), स्थापत्य प्रकल्प, वैद्यकीय मुख्य कार्यालय, वायसीएम, आरोग्य, आकाशचिन्ह व परवाना, निवडणूक व जनगणना विभाग, भूमी आणि जिंदगी, पर्यावरण अभियांत्रिकी, कायदा, बीआरटी प्रकल्प, जलनिःसारण विभागाचा कार्यभार आहे. तत्कालीन अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ हे अनुभवी अधिकारी होते. त्यांनी या पदाला योग्य न्याय देत आलेली कामे त्वरीत मार्गी लावली होती. राज्यातील महाविकास आघाडी, त्यानंतर भाजपा-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना तसेच सध्याची उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह राज्यातील सत्तेच्या काळात देखील त्यांनी समन्वय साधून विकासकामांना गती देण्याचा प्रयत्न केला. नंतरच्या काळात राजकीय हस्तक्षेपामुळे जितेंद्र वाघ यांची बदली करण्यात आली. त्यांच्या जागी विजय खोराटे यांची नियुक्ती झाली आहे. खोराटे यांना पदभार स्वीकारण्यातच 15 दिवस उशिराचा कालावधी लागला. तोपर्यंत या विभागाची कामे खोळंबली होती. त्यानंतर हा विभाग आणि त्यांची कामे समजून घेण्यात त्यांना उशीर होत असल्याचे चित्र आहे. तसेच, खोराटे आणि संबंधित विभागाचे अधिकारी यांच्यात समन्वयाचा अभाव असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे कामांना गती मिळेना झाली आहे. त्यांच्या कामाचा भार आयुक्त शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, उल्हास जगताप यांच्यावर येत आहे. कामे मार्गी लावण्याबाबत आयुक्त शेखर सिंह यांचे कौतूक होत असताना दुसरीकडे अतिरिक्त आयुक्त दोनच्या पदाचा रोष मात्र त्यांच्या माथी फुटताना दिसत आहे.

### लोकप्रतिनिधींचा नाराजीचा सूर...

» प्रभागातील तसेच विधानसभा मतदारसंघातील कामे घेऊन लोकप्रतिनिधींनी नेमलेले प्रतिनिधी महापालिकेत येतात. संबंधीत अधिकाऱ्यांकडे कामांना गती देण्याची मागणी केली जात आहे. मात्र नवीन प्रकल्प, कामे समजून घ्यायला वेळ लागत असल्याने लोकप्रतिनिधी नाराज होत आहेत.

### अनुभवी अधिकाऱ्यांची नियुक्ती हवी...

» अतिरिक्त आयुक्तपदी अधिकाऱ्यांची नियुक्ती करताना अनुभवी अधिकाऱ्यांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. त्यामुळे शहरातील विकासकामांना गती दिली जाईल. मात्र या ठिकाणी अनुभव नसलेले अधिकारी आल्यास त्याचा शहराच्या विकासाला खीळ बसण्याची शक्यता असल्याच्या प्रतिक्रिया लोकप्रतिनिधींच्या महापालिकेतील प्रतिनिधींकडून बोलून दाखवली जात आहे.

---

# मोरया गोसावी ट्रस्टने वादग्रस्त फलक हटवला!

## » व्यवस्थापनाकडून दिलगिरी : संभाजी ब्रिगेडने दिला होता आंदोलनाचा इशारा

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**चिंचवड छत्रपती संभाजी महाराज यांच्या अवमान प्रकरणी कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा संभाजी ब्रिगेडच्या वतीने वकिलामार्फत चिंचवडगाव येथील श्री मोरया गोसावी मंदिर व्यवस्थापनाला दिला होता. ब्रिगेडच्या दणक्यानंतर महाराजांविषयी अवमानकारक असणारा माहिती फलक अखेर हटविण्यात आला असून. त्याबाबत मंदिर व्यवस्थापकाने दिलगिरी व्यक्त केल्याचे संभाजी ब्रिगेडचे शहर अध्यक्ष सतीश काळे यांना कळविले आहे.**



मंदिरातील माहिती फलकावर छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी त्यांचा वध झाला असा अवमानकारक शब्द वापरला होता. त्याचा तीव्र आंदोलन करून निषेध करण्याचा इशारा संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष सतीश काळे यांनी ४ ऑगस्ट रोजी दिला होता. या इशाऱ्यानंतर मंदिर व्यवस्थापनाने वध हा शब्द हटवून बलिदान शब्दाचा समावेश केला होता. त्यावर समाधान न झाल्याने त्याविरोधात आक्रमक होत संभाजी ब्रिगेडने कायदेशीर पाऊले टाकली होती. ॲड. अतुल पाटील यांच्यामार्फत नोटीस पाठवून हा फलक पूर्ण काढून खरा इतिहास सांगणारा फलक लावण्याची मागणी केली होती.

संभाजी ब्रिगेडच्या या दणक्यानंतर सदरचा माहिती फलक हटविण्यात आला असून. मंदिर व्यवस्थापनाकडून दिलगिरी व्यक्त करण्यात आल्याची माहिती संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष सतीश काळे यांनी दिली आहे. फलकावरील मजकूर काल्पनिक... ॲड.अतुल पाटील यांच्या मार्फत नोटीस पाठविण्यात आली होती. ११ ऑगस्ट रोजी नोटीस पाठवली या माहिती फलकातील मजकुर पुर्णपणे काल्पनिक असुन कोणत्याही पुराव्यांचा अभ्यास न करता लिहीलेला आहे.

सदरचा मजकुर हा माहिती फलकावर तसाच ठेवण्यात आल्यास मंदिरात येणाऱ्या कोणत्याही शिव प्रेमींची भावना दुखवली जाईल. तसेच त्यामुळे दोन समाजात जातीय तेढ निर्माण होवू शकते. त्यामुळे ही नोटीस मिळाल्यापासुन दोन दिवसांच्या आत आपल्या मंदिरात लावण्यात आलेला वर नमुद फलक त्वरीत हटविण्यात यावा, अशी मागणी केली होती; आठ दिवसाच्या आत यावर कार्यवाही करण्याची मागणी नोटीस मध्ये नमूद करण्यात आली होती.

---

# लेखणीतून सत्ताधाऱ्यांना घाम फोडा!

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

(पान 1 वरून)

पिंपरी-चिंचवड प्रतिनिधी गोविंद वाकडे आदींचा या वेळी पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. राज ठाकरे म्हणाले की, पत्रकारांवर हल्ले होणे हे अत्यंत निषेधार्थ आहे. पत्रकारांना ट्रोल केले जाते. पण ट्रोल करणाऱ्यांकडे दुर्लक्ष करा. ट्रोल करण्यासाठी राजकीय पक्षांनी लोक पाळली असल्याचा आरोप ठाकरे यांनी केला. सत्तेचा अमरपट्टा कोणी घेऊन येत नाही. सत्ता जेव्हा हातात येते तेव्हा ती जायला सुरुवात झालेली असते. ती किती काळ टिकवायची हे तुमच्या हातात असते, असे ते यावेळी म्हणाले. राज्यात पत्रकारिता अजुनही जिवंत आहे. जे महाराष्ट्राच्या हिताचे आहे, ते लिहिण्याची सध्या गरज आहे, असे आवाहन त्यांनी पत्रकारांना केले. अनेक पत्रकार मंत्र्यांकडे कामाला लागले आहेत. काही वर्षांपुर्वी हे काम लपून छपून केले जायचे पण आता हे काम खुलेआम केले जाते. लेबल लावून आलेले पत्रकार आम्हाला प्रश्न विचारतात त्यांना आम्ही काय उत्तर द्यायचे? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. तसेच छपाई कशी होते इथपासून ते व्यंगचित्रकार म्हणून मी काम पाहिले असल्याची आठवण त्यांनी सांगितली.

### संतपीठ हे जीवन घडविणारे ज्ञानपीठ ; हभप बाजीराव चंदिले

परंतु, अभिजात ज्ञान मिळवल्यानंतर संगीताचा प्रवास गायक गाईल तो राग तयार होतो. ज्ञानग्रहण करण्यासाठी किंवा आत्मदर्शन होण्यासाठी गुरुकडे जाणे गरजेचे आहे.

हभप पुरुषोत्तम महाराज म्हणाले, गुरूचे आद्य कर्तव्य म्हणजे साधकाला मार्गदर्शन करणे हे होय. हे मार्गदर्शन घेऊन परमार्थाच्या पथावर प्रगती व्हावी म्हणूनच गुरूचे पाय धरावयाचे असतात. परमार्थात श्रवण व सदगुरू यांना फार महत्त्व आहे. सदगुरूंशिवाय गती नाही, तर श्रवण हा परमार्थाचा पायाच आहे. सदगुरू मुखातून शुद्ध श्रवण घडल्याशिवाय साधकाच्या अंत:करणात नामाची गोडी निर्माणच होत नाही. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हभप प्रा. ज्ञानेश्वर गाडगे यांनी केले. प्रभारी मुख्याध्यापिका स्नेहल पगार यांनी आभार मानले.

# ज्ञान परंपराच्या समावेशाचे स्वागतच हवे!




**राष्ट्रीय शिक्षण धोरणाला केवळ प्रक्रियात्मक मुद्द्यांच्या आधाराने काही राज्ये विरोध करत आहेत. तमिळनाडूने विरोधाचा सूर पहिल्यांदा लावला, त्याचीच री आता कर्नाटकानेही ओढली आहे. विरोधाचे हे प्रकार दुर्दैवीच म्हटले पाहिजेत, कारण शिक्षणविषयक संकल्पनांमध्ये आणि शिक्षणाच्या गाभ्यापर्यंत बदल घडवून नवा भारतीय समाज उभा करणारे असे हे धोरण आहे.**




भारताच्या इतिहासाचा अभ्यास करत असताना, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीनंतरचा भारत अशा तिसऱ्या टप्प्याची कल्पना इतिहासकारांनाही मान्य करावी लागेल इतकी परिवर्तन-शक्ती या धोरणात आहे. शिक्षण हा कुठल्याही राष्ट्राच्या उभारणीमधला अत्यंत महत्त्वाचा घटक असतो. शिक्षणातूनच एखाद्या राष्ट्राचा विचार निर्माण होतो व त्यातूनच त्या राष्ट्राची आर्थिक व सामाजिक प्रगती होत जाते आणि त्याचा परिणाम त्या राष्ट्राच्या संस्कृतीवर होऊन सांस्कृतिक बदल होत जातात. विज्ञान, गणित, अवकाश शास्त्र, व्याकरण व तत्वज्ञान यासारख्या विषयांमध्ये इसवी सन पूर्व काळामध्ये जागतिक ज्ञानामध्ये भारताने दिलेले योगदान अतुल्य आहे. शून्यापासून अनंताकडे जाण्याचा मार्ग भारताने दाखवून गणित, विज्ञान व माहिती तंत्रज्ञानाचे अनेक दरवाजे उघडून प्रगतीकडे जाण्याचे अनेक मार्ग मोकळे केले. आयुर्वेद व योगाच्या आविष्काराने सबंध मानव जातीच्या कल्याणासाठी भरीव योगदान दिले. मंदिरांच्या माध्यमातून अध्यात्म, कला, वास्तुशास्त्र व भूमितीची अनेक उदाहरणे जगासमोर ठेवली. कालपर्यंत या सर्व गोष्टी केवळ धार्मिक व कुतूहलाच्या दृष्टिकोनातून पाहिल्या जात होत्या, मात्र राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीनंतर क्रमिक पुस्तकांच्या माध्यमांतून अभ्यासपूर्ण व तर्कशुद्ध पद्धतीने याची मांडणी करून विद्यार्थ्यांपर्यंत हे पोहोचवण्याचे कार्य होत आहे. भारताच्या या ज्ञानपरंपरेबद्दल कालपर्यंत जे विद्यार्थी अनभिज्ञ होते ते इथून पुढे त्याबद्दल सार्थ अभिमान बाळगतील. शास्त्रीय नृत्य, गायन सारख्या श्रेष्ठ कला ज्यांच्या निर्मितीचे बीजे भारतीय स्थापत्य कला, लोककलांमध्ये पाहावयास मिळतात त्या सर्व कलांना व प्रादेशिक भाषांना बळ देण्याचे कार्यसुद्धा हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण करत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी ही भारताच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाची घटना आहे. पाश्चात्य विचाराच्या मॉडेलला छेद देऊन, भारतीय वैचारिक मॉडेलला स्वीकारणे व ते सर्वांपर्यंत पोहोचवून नविन ज्ञानाधिष्ठित समाजाची निर्मिती करणे हा अत्यंत उदात्त दृष्टिकोन समोर ठेवून या शैक्षणिक धोरणाची निर्मिती झाली आहे. विद्यार्थी केंद्रबिंदू मानून २०३० पर्यंत टप्प्याटप्प्याने धोरणाची अंमलबजावणी करत नवीन भारताची निर्मिती करणे हे या मागचे उद्दिष्ट आहे. भारताला विकसित देशांच्या यादीमध्ये पोहोचवत असताना ज्ञानाधिष्ठित समाजाची निर्मिती करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून, सर्वांना शिक्षण, समानता, गुणवत्ता, परवडणारे शिक्षण आणि उत्तरदायित्व– या पाच खांबावरती हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण उभे करण्यात आले आहे. पूर्वीच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात आमूलाग्र बदल करून, भारतीय ज्ञान परंपरेला मार्गदर्शक दीपस्तंभ मानून, नविन भारतीय विचारांचे मॉडेल निर्माण करणे हे या शैक्षणिक धोरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्या मागचे प्रयोजन म्हणजे, भारताची भावी पिढी स्वतंत्रपणे विचार करून भारतीय ज्ञान परंपरेप्रमाणे प्रादेशिक भाषेत ज्ञान घेऊन नवीन भारताच्या निर्मितीमध्ये आपले योगदान देण्यास सक्षम बनवणे हे आहे. पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भारतीय ज्ञान परंपरेचा पेपर अभ्यासून त्यात एकूण श्रेयांकच्या पाच टक्के श्रेयांक घेणे अनिवार्य केले आहे. त्याचबरोबर एखाद्या विद्यार्थ्याने भारतीय ज्ञान परंपरेचा मुख्य विद्या शाखा म्हणून निवड केली असेल तर अशा विद्यार्थ्यांना ५० टक्के श्रेयांक घेणे हे अनिवार्य आहे. भारतीय ज्ञान परंपरेला अभ्यास व संशोधनाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी नेट (NET) या परीक्षेमध्ये त्याचा समावेश केला आहे व उच्च विद्या विभूषित होण्यासाठी करावयाच्या संशोधनामध्येही त्याचा समावेश केलेला आहे. खऱ्या अर्थाने भारताचा शोध घ्यायचा असेल तर संशोधकाच्या हातामध्ये भारतीय ज्ञान व तत्वज्ञानाची गुरुकिल्ली असणे आवश्यक आहे.

## संपादकीय »

### साच्याबाहेरची भाषा..!

***पिढ्यानपिढ्या रूढ झालेल्या, म्हणून नेहमीच्या शब्दांमधून आपण स्त्रीवर अन्याय करतो आहोत, ही जाणीव होऊन शब्द बदलणे हेसुद्धा संवेदनशीलतेचे लक्षण..***

विधवा, व्यभिचारी, वेश्या, रखेल, रांड, कलंकिनी, अपवित्र, पापी, कुलटा, उनाड, घर फोडणारी, वांझ, पतिता, टाकलेली, ठेवलेली, वापरलेली बाई.. या आणि अशा अनेक शब्दांशी संबंधित कोणतीही कृती संबंधित स्त्रीने एकटीने आणि हौसमौज म्हणून केलेली नसते. पण तिचे सामाजिक स्थान दाखवून देण्यासाठी या शेलक्या विशेषणांनी तिची संभावना केली जाते आणि ती कुणालाच चुकीची वाटत नाही.

उलट असे शब्द वापरून संबंधित स्त्रीची अधिकाधिक मानहानी करणे, तिची स्वाभिमानाची नांगी ठेचणे हाच सार्वत्रिक उद्योग आपल्या समाजात सुरू असतो. आपल्या कर्तृत्वाने सर्वोच्च पदावर पोहोचलेली स्त्रीही त्यामधून सुटत नाही. पुरुषप्रधान मानसिकतेचे हे हलाहल पचवून पुढे जात राहण्याशिवाय पर्याय नाही, हे वास्तव स्त्रियांनी त्यांच्या पातळीवर स्वीकारले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

**ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी रुग्णालयात एकापाठोपाठ दगावलेल्या रुग्णांमुळे 'आजारी आरोग्य यंत्रणा' चर्चेत आली. प्रगत देशांपेक्षा आपला सार्वजनिक आरोग्यसेवेवर होणारा खर्च कमी आहे, विमा योजनेत अडचणी आहेत, या नेहमीच्या मुद्द्यांची उजळणी झाली. दुसऱ्या-तिसऱ्याच दिवशी महाराष्ट्रातले मुखमंत्री आपलं आसन भक्कम असल्याची ग्वाही देऊ लागले.**

# अमेरिकेच्या मार्गाने गेल्यास अनर्थ ओढवेल

म्हणजे एकप्रकारे सगळं पुन्हा नेहमीसारखं सुरू झालं आणि ते 'नेहमीचे मुद्दे' पुन्हा नेहमीसाठी विसरले गेले. पण ज्या प्रगत देशांची उदाहरणं दिली जातात, त्यापैकी अमेरिकेची स्थिती निराळ्या कारणांनी वाईट आहे, हे आपल्याला माहीत असायला हवं! कशासाठी? तर ज्या ठाणे शहरात एकाच दिवशी १८ रुग्ण बळी जातात असं सार्वजनिक रुग्णालय आहे, त्याच शहरात अलिशान पंचतारांकित म्हणावं असं खासगी रुग्णालयही आहे, हजार रुपये एका वेळचे दिल्याशिवाय रुग्णावर नजरही न टाकणारे स्पेशालिस्ट डॉक्टर आहेत. 'ज्यांना परवडतं त्यांना आरोग्य' ही अमेरिकेत बोकाळलेली व्यवस्था आपल्याकडेही हातपाय पसरते आहे. ही व्यवस्था ज्या देशानं दिली, त्या अमेरिकेत काय चाललं आहे? 'अमेरिकेचं सरासरी आयुर्मान सध्या ७७.२८ वर्षं, पण २०१४ पासून ते खालावतच गेलं आणि तेव्हाच्या ७८.८४ पासून २०१९ मध्ये



ते ७८.७९ झालं. मात्र २०१४ ते १९ या काळातही, अमेरिकी अतिश्रीमंतांचं आयुर्मान महिलांमध्ये ८८.९, तर पुरुषांमध्ये ८७.३ असताना अतिगरीब अमेरिकनांमध्ये हेच आकडे महिला- ७८.८ तर पुरुष- ७२.७ असे होते. म्हणजे श्रमाची कामं करावी लागलेल्या पुरुषांचा मृत्यू श्रीमंत पुरुषांपेक्षा १५ वर्षं आधीच होतो, हे दिसत होतं. (अर्थात भारतीयांच्या ७०.१५ वर्षं या सध्याच्या सरासरीपेक्षा ते जास्तच आहे, हेही लक्षात ठेवूया). पण 'नेटिव्ह अमेरिकन' म्हणवणाऱ्या अमेरिकी आदिवासींमध्ये पुरुषांचं सरासरी आयुष्य ६१.५ वर्षं. एवढंच आहे. त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे, 'धडधाकट आयुष्य' जगणाऱ्या आणि मृत्यूच्या अगदी दोन-तीन वर्षं आधीपर्यंत हिंडतेफिरते असणाऱ्या अमेरिकनांचं प्रमाण फारच कमी आहे. फक्त ६६.१ वर्षं! याचा अर्थ असा की, अतिश्रीमंत आणि अतिगरीब यांच्या मधला वर्ग जास्त जगू शकतो आहे, पण औषधोपचार आणि विम्याच्या बळावर!

अमेरिकेच्या ५० राज्यांपैकी ४० राज्यांनी सरकारी आरोग्यविम्याची सोय ठेवली आहे. पण १० राज्यांत ती नाही. ती नसलेल्या मिसिसिपीसारख्या राज्यात मात्र आयुर्मान ७१.९ वर्षं- म्हणजे भारतापेक्षा जास्तच, पण बांगलादेशपेक्षा (तिथली सरासरी ७२.४) कमीच. औषधोपचारांच्या उत्तमोत्तम सोयी अमेरिकेत आहेत, अगदी चौथ्या टप्प्यावरचा कर्करोगही बरा होऊ शकेल इतकं वैद्यकशास्त्र पुढे गेलं आहे. आपल्याला माहीतच आहे की, भारतातली अनेक चांगली डॉक्टरमंडळी तिथं स्थायिक झालेली आहेत. तरीही असं कसं? 'मधुमेहासारख्या रोगाशी ११.३ टक्के अमेरिकन सामना करत आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**


**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# सांगली जिल्ह्यात जनावरांचे आठवडी बाजार!

## » बैलगाडी शर्यतीला बंदी, जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

। सांगली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वर्षभरानंतर जिल्ह्यात पुन्हा एकदा जनावरांमध्ये लम्पीचे प्रमाण वाढत आहे. गेल्या केवळ ११ दिवसातच एक हजार ९२ जनावरे बाधित झाली आहेत. या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा लम्पीला प्रतिबंध करण्यासाठी तात्काळ उपाययोजना करण्यात येत आहेत.**



त्यानुसार जिल्ह्यात होणारे जनावरांचे आठवडी बाजार बंद करण्यात येणार आहेत. याशिवाय होत असलेल्या बैलगाडी शर्यतींवरही बंदी असेल. लम्पीची लाट असल्याने या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ.राजा दयानिधी यांनी पत्रकार बैठकीत दिली. जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी म्हणाले की, वर्षभरानंतर जिल्ह्यातच नव्हेतर संपूर्ण राज्यातच लम्पीचे प्रमाण पुन्हा वाढत आहे. १ एप्रिलपासून आतापर्यंत १६२९ बाधित जनावरे आढळली आहेत. यातील ७२ जनावरांचा मृत्यू झाला आहे. ७ ऑगस्ट ते १८ ऑगस्ट या कालावधीत जिल्ह्यात १०१६ जनावरांना लम्पीची बाधा झाल्याने याची लाट आल्याचे स्पष्ट झाले आहे.

लम्पीची लागण जनावरांमध्ये वाढू नये यासाठी आता जनावरांचे आठवडी बाजार यापुढे भरविण्यात येणार नाहीत.

अनेकठिकाणी सध्या प्रशासनाची परवानगी घेऊन बैलगाडी शर्यतीही आयोजित करण्यात येत आहेत. यापुढे शर्यतींना बंदी असणार आहे. जनावरांची एका भागातून दुसऱ्या भागात वाहतूक करण्यासही बंदी घालण्यात आली आहे. लम्पीची लागण जनावरांमध्ये वाढू नये म्हणून प्रशासनाने नियोजन केले आहे. त्यानुसार लसीकरणासह पशूपालकांचे प्रबोधनही करण्यात येणार आहे. आतापर्यंत तीन लाख २४ हजार ७५६ जनावरांचे लसीकरण पूर्ण करण्यात आले आहे. आतापर्यंत ५४ टक्के लसीकरण पूर्ण करण्यात आले आहे. येत्या आठवड्याभरात १०० टक्के लसीकरण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

### अकरा दिवसात 27 जनावरांचा मृत्यू

» वर्षभर लम्पीबाधित जनावरे आढळत असलीतरी त्याचे प्रमाण कमी होते. गेल्या पंधरवड्यापासून मात्र, मोठ्या संख्येने बाधित जनावरे आढळत आहेत. यात अकरा दिवसात १०१६ जनावरांना लम्पीची लागण झाली आहे तर यातील १३४ जनावरे बरी झाली आहेत. केवळ अकरा दिवसात २७ जनावरांचा मृत्यू झाला असून, सध्या ८५५ लम्पीबाधित जनावरे जिल्ह्यात आहेत. यात वाळवा तालुक्यात सर्वाधिक ४८८, शिराळा २८३, पलूस २५६, मिरज २३, तासगाव १३, कवठेमहांकाळ १८ तर कडेगाव तालुक्यात ११ जनावरे बाधित आहेत.

# महिलेला पाच वर्षानंतर घरकुल

## » आयर्विन पुलाच्या बांधकामात योगदान

। सांगली ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कृष्णा नदीवरील ऐतिहासिक आयर्विन पुलाच्या बांधकामावेळी मजूर म्हणून काम करणाऱ्या वृद्ध महिलेला महापालिकेने घरकुल देण्याचे आश्वासन दिले होते. अखेर पाच वर्षानंतर वृद्धेला दिलेल्या आश्वासनाची पुर्तता करण्यात आली. तिला महापालिकेच्यावतीने संजयनगर घरकुल योजनेतील सदनिका देण्यात आली.**



सहा गल्ल्यांची नगरी म्हणून सांगलीची ओळख. कृष्णा नदीकाठी वसलेल्या सांगलीला १९१४ व १९१६ मध्ये प्रलयकारी महापुराचा सामना करावा लागला होता. त्यावेळी महापुरानंतर कृष्णा नदीवर पुल असावा, अशी चर्चा सुरु झाली. तत्कालीन सांगली संस्थानचे अधिपती चिंतामणराव पटवर्धन दुसरे यांनी पुलासाठी पुढाकार घेतला. १९२७ मध्ये कृष्णा नदीवरील पुलाचे बांधकाम सुरू झाले आणि १९२९ मध्ये ते पूर्ण झाले. या पुलाचे उद्घाटन तत्कालीन व्हॉईसराय लार्ड आयर्विन यांच्याहस्ते झाल्याने त्यांचेच नाव पुलाला देण्यात आले. गेली ९३ वर्षे हा पुल अनेक ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार बनला आहे. या पुलाच्या बांधकामावेळी सांगलीतील लक्ष्मी पुजारी यांनी मजूर म्हणून काम केले होते. त्यांनी पुलासाठी दगड डोक्यावरून आणले होते. सध्या पुजारी ११० वर्षांच्या आहेत. पाच वर्षापूर्वी महापालिकेत भाजपची सत्ता आली. तेव्हा आयर्विन पुलाच्या वाढदिवसानिमित्त लक्ष्मी पुजारी यांना घरकुल देण्याची घोषणा तत्कालीन महापौर संगीता खोत यांनी केली होती. पुजारी यांची परिस्थिती गरीबीची आहे. त्यांना घर नाही. सध्या त्या नातीकडे राहतात. महापौर खोत यांनी घरकुलाबाबत महासभेत ठरावही केला होता. पण प्रशासकीय मंजुरीत तब्बल पाच वर्षे निघून गेली. नगरसेवक राजेंद्र कुंभार यांनी सातत्याने पाठपुरावा केला. आता नगरसेवकांचा कार्यकाल संपताना पुजारी यांना संजयनगरमधील पत्राचाळ घरकुल योजनेतील एक सदनिका देण्यात आली. यावेळी स्थायी सभापती धीरज सूर्यवंशी, नगरसेवक राजेंद्र कुंभार, पांडूरंग कोरे, कल्पना कोळेकर, उर्मिला बेलवलकर, महिला बालकल्याण सभापती अस्मिता सरगर उपस्थित होत्या.

### प्रशासकीय मंजुरीत तब्बल पाच वर्षे

» पाच वर्षापूर्वी महापालिकेत भाजपची सत्ता आली. तेव्हा आयर्विन पुलाच्या वाढदिवसानिमित्त लक्ष्मी पुजारी यांना घरकुल देण्याची घोषणा तत्कालीन महापौर संगीता खोत यांनी केली होती. पुजारी यांची परिस्थिती गरीबीची आहे. त्यांना घर नाही. सध्या त्या नातीकडे राहतात. महापौर खोत यांनी घरकुलाबाबत महासभेत ठरावही केला होता. पण प्रशासकीय मंजुरीत तब्बल पाच वर्षे निघून गेली. नगरसेवक राजेंद्र कुंभार यांनी सातत्याने पाठपुरावा केला.

# सांगली महापालिकेत आजपासून प्रशासकराज

। सांगली ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

महापालिकेच्या नगरसेवकांचा पाच वर्षाचा कार्यकाळ १९ ऑगस्ट रोजी संपत आहे. त्यामुळे महापालिकेची सुत्रे प्रशासकाच्या ताब्यात जातील. त्यात शनिवारी सुट्टी असल्याने आजचा दिवस नगरसेवकांच्या कामकाजाचा शेवटचा दिवस ठरला. दरम्यान, महापौरांसह विविध पदाधिकाऱ्यांची कार्यालये, वाहने ताब्यात घेण्याचे आदेश आयुक्त सुनील पवार यांनी खातेप्रमुखांना दिले आहेत. महापालिकेतील नगरसेवकांचा पाच वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झाला. गुरुवारी शेवटची महासभा तर शुक्रवारी स्थायी समितीची सभा झाली. दोन्ही सभेत सदस्यांचा सन्मान करण्यात आला. प्रशासनाच्यावतीने नगरसेवकांना स्मृतीचिन्हे देऊन गौरविण्यात आले. नगरसेवकांची मुदत शनिवारी संपणार असली तरी सुट्टीचा दिवस असल्याने एकदिवस आधीच त्यांची मुदत संपली. दरम्यान आयुक्त सुनील पवार यांनी महापौर, स्थायी समिती सभा, गटनेत्यांची वाहने, कार्यालये, मोबाईल ताब्यात घेण्याचे आदेश प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिले आहेत. पदाधिकाऱ्यांची कार्यालये शुक्रवारी सायंकाळी सील करण्यात आली. पदाधिकाऱ्यांकडे कार्यरत स्वीय सहाय्यक, शिपाई, लिपीक पदावरील कर्मचाऱ्यांना इतर विभागात तातडीने बदली करण्याची सूचना देण्यात आली आहे. स्थायी सभापती धीरज सूर्यवंशी यांनी शुक्रवारीच आपल्याकडील वाहन प्रशासनाच्या ताब्यात दिले.गुरुवार १७ रोजी तर स्थायीची सभा शुक्रवार १८ झाली. नगरसेवकांची मुदत १९ रोजी संपणार असली तरी आयुक्त पवार यांनी दोन्ही सभागृहातील सभेचे मिनिटस्, इतिवृत्त सीलबंद करून ताब्यात घेण्याचे आदेश उपायुक्तांना देण्यात आले आहेत.

### प्रशासक नियुक्तीचा प्रस्ताव शासनाकडे

» महापालिकेचा कारभार आयुक्तांच्या हाती येणार असला तरी शासनाकडून अधिकृत मान्यता घ्यावी लागणार आहे. त्यासाठी महापालिकेवर प्रशासक नियुक्त करण्याचा प्रस्ताव नगरसचिव कार्यालयाकडून शासनाकडे पाठविण्यात आला आहे. त्यावर सोमवारपर्यंत शिक्कामोर्तब होईल.

# लडाखमध्ये लष्कराचा ट्रक दरीत कोसळला!

## » 8 जवानांचा जागीच मृत्यू; दोघे गंभीर जखमी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लडाखमधून एक धक्कादायक व मन हेलावून टाकणारी घटना शनिवारी संध्याकाळी घडली आहे. भारतीय लष्कराचे एक वाहन रस्त्यावरून जात असताना खोल दरीत कोसळल्याने या अपघातात 8 जवान शहीद झाले आहेत. तर दोन जवान गंभीर जखमी आहेत. कियारी शहरापासून 7 किमी अंतरावर असलेल्या कारू चौकीजवळच हा भीषण अपघात झाला.**



लष्कराच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, ताफ्यात पाच वाहने होती, जे रस्त्याच्या कडेला असलेल्या खोल खड्ड्यात अर्थात दरीत पडले.त्यात 10 सैनिक होते. या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये एका ज्युनिअर कमिशन्ड ऑफिसर (जेसीओ) सह आठ जवानांचा समावेश आहे.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या अपघातावर शोक व्यक्त केला आहे. त्यांनी ट्विटरवर लिहिले - लडाखमधील लेहजवळ झालेल्या अपघातात भारतीय लष्कराच्या जवानांच्या मृत्यूने मी दु:खी आहे. माझे विचार शोकाकुल कुटुंबांसोबत आहेत. जखमींना मैदानी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मी ते लवकरात लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना करतो. 29 एप्रिल 2023 रोजी जम्मू-काश्मीरमधील राजौरी येथे लष्कराची रुग्णवाहिका रस्त्यावरून घसरली आणि 200 फूट खोल दरीत पडली. या अपघातात दोन जवानांचा मृत्यू झाला होता.

त्याचवेळी 2 जवानही जखमी झाले आहेत. वास्तविक नियंत्रण रेषेजवळ (LOC) केरी सेक्टरमध्ये ही घटना घडली.

### राजनाथ सिंहांनी व्यक्त केला शोक

» संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या अपघातावर शोक व्यक्त केला आहे. त्यांनी ट्विटरवर लिहिले - लडाखमधील लेहजवळ झालेल्या अपघातात भारतीय लष्कराच्या जवानांच्या मृत्यूने मी दु:खी आहे. माझे विचार शोकाकुल कुटुंबांसोबत आहेत. जखमींना मैदानी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मी ते लवकरात लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना करतो.

बिहारचे हवालदार सुधीर कुमार आणि राजौरी येथील परमवीर शर्मा अशी या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या जवानांची नावे आहेत. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्येही कुपवाड्यातील माछिल भागात हिमस्खलनात तीन जवान शहीद झाले होते. 2 जवानांना बर्फाखालून सुखरूप बाहेर काढण्यात आले.

ही घटना घडली तेव्हा ५६ राष्ट्रीय रायफल्सचे पाच जवान नियमित गस्तीवर होते. अपघाताची माहिती मिळताच बचावकार्य सुरू करण्यात आले, मात्र जवानांना बाहेर काढेपर्यंत 3 जणांचा मृत्यू झाला होता. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये सिक्कीममधील जेमा येथे लष्कराचा ट्रक दरीत पडला होता. यामध्ये 16 जवान शहीद झाले.

एका तीव्र वळणावर वाहन घसरले आणि थेट दरीत कोसळल्याचे लष्कराने सांगितले. या वाहनासोबत लष्कराच्या आणखी दोन व्हॅन होत्या. तिन्ही वाहने सकाळी चाटण येथून थांगूकडे रवाना झाली. लष्कराच्या बचाव पथकाने 4 जखमी जवानांना एअरलिफ्ट करून रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

# 9 दिवसांत 1400 कोटींचा घोटाळा

## » चिनी नागरिक घोटाळा करून गेला

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**फुटबॉल सट्टेबाजी ॲप (दानी डेटा ॲप) वरून झालेल्या 1400 कोटी रुपयांच्या घोटाळ्याप्रकरणी काँग्रेसने गुजरातमधील भाजप सरकारकडे उत्तर मागितले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या राज्यात चिनी घुसखोरी झाल्याचे विरोधकांनी म्हटले आहे. ते म्हणाले की, पंतप्रधान म्हणतात की त्यांच्या नकळत देशात काहीही घडत नाही. एकतर पंतप्रधानांना काय घडत आहे हे कळत नव्हते किंवा सर्वकाही माहीत असूनही त्यांनी डोळे आणि कान बंद केले होते.**



### तपास यंत्रणा विरोधकांसाठी राखीव आहेत

» भाजपने तपास यंत्रणांचा गैरवापर केल्याचा आरोपही काँग्रेसने केला. खेडा म्हणाले- केंद्र सरकार फक्त ईडी, सीबीआय आणि एसएफआयओचा वापर विरोधी पक्षनेत्यांच्या विरोधात करते. जेव्हा चिनी घोटाळेबाज भारतातील जनतेला लुटून पळून जातात तेव्हा ते तपास करत नाहीत. या एजन्सी केवळ विरोधकांसाठी राखीव आहेत.

खरं तर, मीडिया रिपोर्ट्सनुसार, या ॲपचा मास्टरमाइंड चीनच्या शेन्झेनचा रहिवासी वू युआनबेई आहे. तो 2020 ते 2022 दरम्यान भारतात होता. गुजरातमधील पाटण आणि बनासकांठा जिल्ह्यांतील वास्तव्यादरम्यान त्याने आपल्या सहकाऱ्यांसोबत दानी डेटा नावाचे बेटिंग ॲप सुरू केले. यानंतर अवघ्या 9 दिवसांत 1200 लोकांसह 1400 कोटींची फसवणूक करण्यात आली. काँग्रेसचे प्रवक्ते पवन खेडा यांनी शुक्रवारी दिल्लीतील काँग्रेस मुख्यालयात पत्रकार परिषदेत सांगितले - ही त्यावेळची घटना आहे जेव्हा पीएम मोदी निवडणूक प्रचारासाठी अनेकदा गुजरातला जात असत.

अखेर पोलीस त्यावेळी काय करत होते? पाकिस्तानच्या सीमेला लागून असलेल्या संवेदनशील शहरात तो कसा राहत होता? हे प्रकरण 4 हजार कोटी रुपयांच्या घोटाळ्याचे असल्याचा दावा काँग्रेसने केला आहे. पोलिसही या ॲपची जाहिरात करत असल्याचे खेडा यांनी सांगितले. त्यामुळे केंद्र सरकारने श्वेतपत्रिका काढून देशातील जनतेला याचे उत्तर द्यावे. त्याचवेळी भाजपने तपास यंत्रणांचा गैरवापर केल्याचा आरोपही काँग्रेसने केला.

# बेरोजगारांना दरमहा 3000 रुपये भत्ता

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल 19 ऑगस्ट रोजी छत्तीसगडच्या एक दिवसीय दौऱ्यावर आहेत. रायपूर येथील कामगार परिषदेत त्यांनी राज्यातील जनतेला 10 आश्वासने दिली. केजरीवाल यांनी राज्यात मोफत वीजेचे आश्वासन दिले आहे. तसेच शिक्षण, आरोग्य आणि राज्य भ्रष्टाचारमुक्त करण्याचे आश्वासन दिले. तरुणांना नोकरी मिळत नाही तोपर्यंत दरमहा 3 हजार रुपये बेरोजगार भत्ता दिला जाईल. त्यांच्या मते, सरकार स्थापन होताच सर्व आश्वासने पूर्ण होतील. केजरीवाल म्हणाले की, 10वी हमी छत्तीसगडमधील शेतकरी आणि आदिवासींसाठी असेल. ही सर्वात मोठी हमी असेल. मात्र, त्यासाठी लवकरच पुन्हा राज्याचा दौरा करणार असून त्यानंतर घोषणा केली जाईल, असे त्यांनी सांगितले. भगवंत मान यांनी आपल्या भाषणात काँग्रेस आणि भाजपवर सडकून टीका केली. ते म्हणाले- आम्ही आश्वासन देत नाही, कामाची हमी देतो. दिल्ली आणि पंजाबच्या विकासकामांचे उदाहरणही त्यांनी दिले. मान म्हणाले की, मी छत्तीसगडमधून सांगतोय की आम्ही जे बोलतो ते करतो. आम्ही जुमला बनवत नाही, ते आमचे काम नाही.

पंजाबमध्ये आम्ही कोणतीही हमी दिली नव्हती, ती आम्ही पूर्ण केली. आमदारांची पेन्शन बंद झाली, अनेकांना तोट्यात फायदा होता, आमदारांना लाखोंची पेन्शन मिळायची. आम्ही मंत्र्यांना पकडले, नेत्यांना पकडले, करोडोंचे घर, लाचेच्या पैशातून आलिशान बाथरूम बांधले. शहीद जवानांच्या आत्म्याला दुखावणारी अशीच एक गोष्ट आढळून आली. तेथून नोटा मोजण्याचे मशीन सापडले. म्हणजे लुटलेले पैसे मोजता येत नव्हते, यंत्र वापरायचे.

# आयुष्मान भेटला खऱ्या ड्रीम गर्लला

आयुष्मान खुराना लवकरच 'ड्रीम गर्ल 2' मध्ये दिसणार आहे. दरम्यान, त्याची भेट रियल ड्रीम गर्ल म्हणजेच हेमा मालिनी यांच्यासोबत झाली, ज्याचा व्हिडिओ आयुष्मानने त्याच्या सोशल मीडिया अकाउंटवर शेअर केला आहे. व्हिडीओमध्ये आयुष्मान हेमा यांच्यासोबत 1977 मध्ये आलेल्या ड्रीम गर्ल चित्रपटातील 'ड्रीम गर्ल' गाण्यावर डान्स करताना दिसला. व्हिडिओमध्ये आयुष्मान हेमासोबत हातात हात घालून नाचताना दिसत आहे. या दरम्यान हेमा फिकट गुलाबी रंगाच्या साडीत खूपच सुंदर दिसत आहेत. व्हिडिओ शेअर करताना, अभिनेत्याने कॅप्शनमध्ये लिहिले - या क्षणासाठी कृतज्ञ, @DREAMGIRLHEMAMALINI जी एक प्रेरणा बनल्याबद्दल धन्यवाद. व्हिडिओ



समोर येताच चाहते हेमा मालिनी यांच्या सौंदर्याचे कौतुक करत आहेत. व्हिडिओवर कमेंट करताना एका यूजरने लिहिले की, 'खरंच ती एक ड्रीम गर्ल आहे. आणखी एका यूजरने लिहिले की, 'त्या 74 वर्षांच्या आहेत यावर माझा विश्वास बसत नाहीये'. तिसऱ्याने लिहिले, 'व्वा, खूप सुंदर दिसत आहे'. आयुष्मान खुराना आणि अनन्या पांडे स्टारर चित्रपट 'ड्रीम गर्ल 2' या महिन्याच्या 25 तारखेला रिलीज होणार आहे. राज शांडिल्य दिग्दर्शित, हा चित्रपट 2019 च्या ड्रीम गर्ल चित्रपटाचा सिक्वेल आहे, ज्याला प्रेक्षकांनी चांगला प्रतिसाद दिला. ड्रीम गर्ल 2 मध्ये पुन्हा एकदा आयुष्मान पूजा बनून चाहत्यांना हसवणार आहे. आयुष्मान आणि अनन्या व्यतिरिक्त अन्नू कपूर, राजपाल यादव, परेश रावल, असरानी, मनजोत सिंग आणि विजय राज हे देखील चित्रपटात मुख्य भूमिकेत दिसणार आहेत.

# चित्रपटाची कमाई हेच यशाचे माप



फेब्रुवारी 2022 पासून आतापर्यंत यामी गौतमचे पाच चित्रपट थिएटर आणि ओटीटीमध्ये आले आहेत. नवा चित्रपट OMG-2 आहे. यामीने दैनिक भास्करशी संवाद साधताना सांगितले की, चित्रपटाचा दर्जा कलेक्शनवरून मोजता कामा नये. यामी म्हणाली की, आजकाल सामान्य लोकही व्यापाराची भाषा बोलू लागले आहेत. चित्रपट चांगला आहे की नाही हे त्याच्या बॉक्स ऑफिस कलेक्शनवरून ठरवले जाते. मी माझ्या नवीन चित्रपटासाठी प्रशिक्षण घेत होते. मग माझा केअरटेकर माझ्याकडे आला. तो म्हणाला मॅडम, तुमचा चित्रपट खूप चांगला आहे, पण कमाई दुसऱ्या चित्रपटाची (गदर-2) झाली आहे. मी आश्चर्यचकित झालो. हे सर्व उद्योग करणारे लोक करतात, पण आता सामान्य जनताही व्यापाराची भाषा बोलू लागली आहे. हा चित्रपट किती चांगला आहे यावर नाही, तर चित्रपटाने किती कमाई केली, याचीच चर्चा आहे. ते खूप धोकादायक आहे. कलेक्शन हेच चित्रपटाच्या गुणवत्तेचे मोजमाप बनू नये ही भीती. माझे कुटुंब माझे सर्वात मोठे टीकाकार आहे. तिथून स्तुती होत असेल तर काय हरकत आहे. मला आठवते 'लॉस्ट' चित्रपटाच्या वेळी माझे वडील म्हणाले होते - यामी, तू इतकी चांगली अभिनेत्री कधी झालीस? ज्या तीव्रतेने ते म्हणाले, प्रसंगोपात, त्या गोष्टीची पुनरावृत्ती OMG-2 दरम्यानही झाली. प्रेक्षक चित्रपटातील कोर्टरूम ड्रामाचा आनंद घेत होते. पती आदित्य धरने हा चित्रपट रिलीज होण्यापूर्वीच पाहिला होता.

# जरीन कामावर परतली

काही दिवसांपूर्वी अभिनेत्री जरीन खानला डेंग्यू झाला होता. यामुळे तिला रुग्णालयात दाखल करावे लागले होते. आता ती बरी असून अलीकडेच ती मुंबईत स्पॉट झाली होती. ज्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आला आहे. व्हिडिओमध्ये जरीन पांढरा शर्ट आणि निळ्या डेनिम जीन्समध्ये दिसली. पापाराझींशी बोलताना तिने आपल्या आरोग्याची माहितीही दिली. एका पापाराझीने अभिनेत्रीला विचारले की इतके दिवस ती कुठे होती? तर झरीनने सांगितले की ती गेल्या आठवड्यात हॉस्पिटलमध्ये होती. पुढे म्हणाली– मला आता थोडं बरं वाटतंय, म्हणून वाटलं कामावर परत जाऊया. यापूर्वी जरीन खानने इंस्टाग्राम हँडलवर काही फोटो शेअर करून डेंग्यूची माहिती दिली होती. हातात ड्रिप असलेला फोटो शेअर करत जरीनने लिहिले- 'लाइफ अपडेट.' मात्र, काही वेळाने अभिनेत्रीने ती पोस्ट डिलीट केली होती. नंतर जरीनने ज्यूसच्या ग्लासचा आणखी एक फोटो शेअर केला. या पोस्टद्वारे जरीनने तिच्या चाहत्यांना आणि फॉलोअर्सना डेंग्यूचा प्रसार रोखण्यासाठी आणि खबरदारी घेण्याच्या सूचना केल्या होत्या. जरीनने 2010 मध्ये 'वीर' या चित्रपटातून आपल्या फिल्मी करिअरला सुरुवात केली. त्यानंतर लोकांनी तिची कतरिना कैफसोबत तुलना करायला सुरुवात केली. सलमानच्या रेडी चित्रपटातील कैरेक्टर ढीला ही तिची आयटम नंबर कॅरेक्टर खूप लोकप्रिय झाली होती. जरीनने अक्षय कुमारच्या हाऊसफुल 2 या चित्रपटातही काम केले आहे. याशिवाय 2, हेट स्टोरी-3, वजा तुम हो आणि हम भी अकेले, तुम भी अकेले या चित्रपटांमध्ये दिसली होती.





# परिणीती चोप्राने गायले पंजाबी गाणे

काल रात्री आलिया भट्ट तिची आई सोनी राजदान आणि बहीण शाहीन भट्टसोबत डिनरसाठी बाहेर गेली होती. जिथे ती एका फोटोग्राफरची चप्पल हाताने उचलताना दिसली. यादरम्यान, सोशल मीडियावर एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्याला पाहून चाहते तिचे खूप कौतुक करत आहेत. व्हिडिओमध्ये आलिया मुंबईतील एका रेस्तरॉंबाहेर दिसत आहे. ती आईसोबत बाहेर जात होती. छायाचित्रकार त्यांचे फोटो काढण्यासाठी धावत असताना त्यातील एकाची चप्पल पायातून निघाली. आलियाने चप्पल पाहिल्यावर विचारले ती कोणाची आहे? तेथे उपस्थित असलेल्या एका छायाचित्रकाराने त्यांच्यापैकी एकाचे असल्याचे उत्तर दिले. हे ऐकून आलियाने तिच्या हाताने चप्पल उचलली आणि फोटोग्राफरला दिली. या व्हिडिओवरील कमेंट सेक्शनमध्ये चाहते आलियाच्या या कृतीचे कौतुक करत आहेत. व्हिडिओवर कमेंट करताना एका यूजरने लिहिले की, 'ये है असली क्वीन'. दुसऱ्या यूजरने त्याचे वर्णन डाउन टू अर्थ असे केले गेले आहे. तर तिसऱ्याने लिहिले, 'ती खूप गोड आणि विनम्र आहे, आलिया माझी आवडती अभिनेत्री आहे'.आलिया भट्ट गॅल गॅडोट आणि जेमी डोर्नन यांच्यासोबत 'हार्ट ऑफ स्टोन'मधून हॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. नेटफ्लिक्सने या स्पाय-ॲक्शन चित्रपटाचा ट्रेलर लॉंच केला आहे. या चित्रपटाद्वारे आलिया भट्टने हॉलिवूडमध्ये पदार्पण केले आहे. 'हार्ट ऑफ स्टोन' या चित्रपटात गॅल गॅडोट आणि जेनी डोर्नन मुख्य भूमिकेत आहेत. तर आलिया भट्ट खलनायकाच्या भूमिकेत दिसणार आहे.आलिया भट्टच्या वर्क फ्रंटबद्दल बोलायचे झाले तर ती लवकरच करण जोहर दिग्दर्शित रॉकी और रानी की प्रेम कहानी या चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटात

# अंतिम पंघालने जिंकले 2 सुवर्णपदक!

## सलग दोनदा सुवर्ण जिंकणारी पहिली भारतीय

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

काल शुक्रवारी रात्री उशिरा 20 वर्षांखालील जागतिक कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून पंघालने इतिहास रचला. सलग दोनदा अंडर-20 जागतिक कुस्ती स्पर्धेचे विजेतेपद जिंकणारी ती भारतातील पहिली महिला कुस्तीपटू ठरली. तिने येथे 53 किलोमध्ये विजेतेपद पटकावले. अंतिम फेरीत तिने युक्रेनच्या मारिया येफ्रेमोव्हाचा ४-० असा पराभव केला. गेल्या वर्षी, अंडर-20 वर्ल्ड रेसलिंग चॅम्पियनशिपमध्ये सुवर्ण जिंकणारी ती पहिली भारतीय महिला कुस्तीपटू ठरली. अंतिम आता वरिष्ठ पातळीवरही खेळते.




सवितानेही 62 किलो वजनी गटात विजेतेपद पटकावले. प्रिया मलिकने गुरुवारी ७६ किलो गटात विजेतेपद पटकावले. ६२ किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत सविताने व्हेनेझुएलाच्या ए.पाओलाचा पराभव केला. 20 वर्षांखालील जागतिक कुस्ती चॅम्पियनशिप 2023 जॉर्डनमधील अम्मान आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर 14 ते 20 ऑगस्ट दरम्यान खेळवली जात आहे. अंतिमने विनेश फोगटला आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्याचे आव्हान दिले होते.

भारताची स्टार कुस्तीपटू विनेशने रोहतक येथे सराव करताना दुखापत झाल्यानंतर आशियाई क्रीडा स्पर्धा खेळणाऱ्या भारतीय संघातून तिचे नाव काढून घेतले आहे.फोगटच्या माघारीनंतर पंघाल पुढील महिन्यात चीनमधील हांगझोऊ येथे होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करेल. भारतीय ऑलिम्पिक समितीने स्थापन केलेल्या तदर्थ समितीने महिलांच्या ५३ किलोमध्ये विनेश फोगट आणि पुरुषांच्या ६५ किलोमध्ये बजरंग पुनिया यांना थेट आशियाई क्रीडा स्पर्धेत पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. ऑलिम्पिक पदक विजेते बजरंग पुनिया आणि विनेश फोगट यांना आशियाई खेळ-2022 मधील थेट प्रवेशाविरोधात पंघाल आणि सुजित कलकल यांनी दिल्ली उच्च न्यायालयात अपील केले होते.

मात्र, त्यांचे अपील उच्च न्यायालयाने फेटाळून लावले. यानंतर विनेश आणि बजरंगचा आशियाई स्पर्धेत सहभागी होण्याचा मार्ग मोकळा झाला. पण, विनेशला दुखापत झाली आणि आता अंतिम आशियाई क्रीडा स्पर्धेत 53 किलो गटात भारताचे प्रतिनिधित्व करेल.

22 आणि 23 ऑगस्ट रोजी दिल्लीतील इंदिरा गांधी स्टेडियमवर तदर्थ समितीने घेतलेल्या चाचण्यांमध्ये 53 किलो वजनी गटात अंतिम अव्वल ठरली होती. मागील 23 वर्षांखालील जागतिक कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारी ती पहिली महिला कुस्तीपटू होती.

### आशियाई स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व

अंतिमने विनेश फोगटला आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्याचे आव्हान दिले होते. भारताची स्टार कुस्तीपटू विनेशने रोहतक येथे सराव करताना दुखापत झाल्यानंतर आशियाई क्रीडा स्पर्धा खेळणाऱ्या भारतीय संघातून तिचे नाव काढून घेतले आहे.फोगटच्या माघारीनंतर पंघाल पुढील महिन्यात चीनमधील हांगझोऊ येथे होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करेल

# अरे मॅच आहे की कॉमेडी शो?

## जैस्वाल - गायकवाडमध्ये ताळमेळचा अभाव

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

शुक्रवारी डब्लिनमधील मालाहाइड येथे भारत आणि आयर्लंड यांच्यात खेळल्या गेलेल्या पहिल्या टी २० आंतरराष्ट्रीय सामन्यादरम्यान एक विचित्र घटना घडली. आयर्लंडच्या १४० धावांचा पाठलाग करताना भारतीय सलामीवीर यशस्वी जैस्वाल आणि ऋतुराज गायकवाड मैदानात उतरले होते. ते खेळत असताना त्यांच्यात ताळमेळचा अभाव दिसून आला आणि एक मोठी घोडचूक झाली, पण यजमानांनी त्याच्यावर असे काही केले की त्याचे रूपांतर मजेशीर घटनेमध्ये झाले. हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर खूप व्हायरल होत आहे.



### भारताने सामना जिंकला

यशस्वी जैस्वाल आणि ऋतुराज गायकवाड यांनी पहिल्या विकेटसाठी ४६ धावांची भागीदारी केली. क्रेग यंगने यशस्वी जैस्वालला पॉल स्टर्लिंगकरवी झेलबाद करून ही भागीदारी तोडली. त्यानंतर पाऊस आला आणि काही वेळाने पुढील खेळ रद्द करण्यात आला. डकवर्थ लुईसच्या नियमानुसार भारताने २ धावानी सामना जिंकला. कर्णधार जसप्रीत बुमराहला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.

ही घटना भारतीय डावाच्या दुसऱ्या षटकातील तिसऱ्या चेंडूची आहे. जोशुवा लिटलच्या चेंडूवर यशस्वी जैस्वालने शॉर्ट फाइन लेगच्या दिशेने हलक्या हाताने फ्लिक करून शॉट खेळला आणि धाव घेण्यासाठी पळाला. दुसऱ्या बाजूला नॉन स्ट्रायकरला उभा असलेला ऋतुराज गायकवाड काही पावले चालल्यावर थांबला आणि यशस्वीला परत जाण्याचा इशारा केला. मात्र, यशस्वी जैस्वालचे गायकवाडच्या इशाऱ्याकडे लक्ष नव्हते. त्याने त्याची हाक ऐकली नाही आणि दुसऱ्या बाजूला क्रीझकडे धावत सुटला. भारताचे दोन्ही फलंदाज एकाच बाजूला होते. ऋतुराज गायकवाड आणि यशस्वी जैस्वाल एकाच दिशेने धावत असल्याचे दृश्य पाहायला मिळाले. शॉर्ट फाइन लेगवरील क्षेत्ररक्षक चेंडू नॉन-स्ट्रायकर्सच्या दिशेने बॉल फेकतो.

स्ट्रायकरच्या शेवटी एकही फलंदाज उपस्थित नसल्याने हेही अनाकलनीय होते. क्षेत्ररक्षकाचा थ्रो स्टंपच्या पुढे गेला आणि चेंडू मिड-ऑन क्षेत्ररक्षकाकडे पोहचला. ते पाहताच ऋतुराज गायकवाडने स्टंपकडे धाव घेतली. मिड ऑनच्या क्षेत्ररक्षकाने थ्रो फेकला आणि यष्टीरक्षक तो पकडण्यात अपयशी ठरला. त्याचवेळी ऋतुराज गायकवाडने डाइव टाकत क्रीजच्या आत प्रवेश केला. त्यामुळे भारताचे कोणतेही नुकसान झाले नाही.

# लसिथ मलिंगाचे MI संघात पुनरागमन

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

आयपीएल २०२४ साठी लसिथ मलिंगा मुंबई इंडियन्स संघात परतला आहे. मलिंगा वेगवान गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून संघात सामील होत आहे. तो मुंबई इंडियन्समध्ये न्यूझीलंडचा क्रिकेटर शेन बाँडची जागा घेणार आहे. यापूर्वी तो राजस्थान रॉयल्सशी संबंधित होता. राजस्थान रॉयल्समध्ये वेगवान गोलंदाजी प्रशिक्षक म्हणूनही त्यांची नियुक्ती करण्यात आली होती.

सपोर्ट स्टाफ म्हणून मुंबई इंडियन्ससोबत मलिंगाचा हा दुसरा कार्यकाळ असेल. याआधी २०१८ मध्येही तो मुंबईच्या सपोर्ट स्टाफमध्ये सामील होता. ते मुंबईसाठी मार्गदर्शकाच्या भूमिकेत होते. आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सकडून ८ हंगाम खेळणारा लसिथ मलिंगा आतापर्यंत राजस्थान रॉयल्सचा गोलंदाजी प्रशिक्षक होता. २०२१ मध्ये निवृत्त झाल्यानंतर, मलिंगा २०२२ मध्ये राजस्थान रॉयल्सशी जोडला गेला होता. त्याने रॉयल्ससोबत दोन हंगाम काम केले. या दोन वर्षात त्याला राजस्थान रॉयल्समध्ये कुमार संगकाराची साथ होती, जो संघाचा क्रिकेट संचालक आहे. आयपीएलच्या इतिहासात मुंबई इंडियन्सकडून सर्वाधिक विकेट घेणारा लसिथ मलिंगा २०१७ पर्यंत मुंबईकडून खेळला. मलिंगाच्या नेतृत्वाखाली मुंबईने पाच विजेतेपदे (२०१३, २०१५, २०१७ आणि २०१९) जिंकली आहेत.

याशिवाय २०११ मध्ये चॅम्पियन्स लीग जिंकणाऱ्या मुंबई इंडियन्स संघात लसिथ मलिंगा देखील होता. मलिंगाने मुंबईसाठी एकूण १३९ सामने खेळले आणि ७.१२ च्या इकॉनॉमी रेटने १९५ बळी घेतले. त्यापैकी १७० विकेट्स आयपीएलमध्ये घेतल्या आहेत.